**ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आरक्षण सोडत सुधारीत कार्यक्रम**

१. माहे जानेवारी २०२१ ते एप्रिल २०२२ मध्ये मुदत संपलेल्या सुमारे १९९३ ग्रामपंचायती तसेच माहे मे २०२२ ते डिसेंबर २०२२ या कालावधीत मुदत संपणाऱ्या सुमारे ७६३८ ग्रामपंचायती तसेच

२. आयोगाने दिनांक २९/११/२०१९ रोजी दिलेल्या प्रभाग रचना व आरक्षण कार्यक्रमातील निवडणूक कार्यक्रम रद्द केलेल्या सर्व ग्रामपंचायती व नव्याने स्थापित सुमारे १०१ ग्रामपंचायती

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्र.रानिआ/ग्रापंनि-२०२०/प्र.क्र. ०४ /का-८,
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०३/०६/२०२२.

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
(मुंबई व मुंबई शहर वगळून) .

विषय - **ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक - आरक्षण सोडतीचा सुधारीत कार्यक्रम**

संदर्भ -१. राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक ३०/०५/२०२२ चे आदेश

२.जिल्हाधिकारी सांगली यांचे क्र.सा-१/का-४/ जिपपंस/ आरआर/ ४९७/ २०२२, दिनांक ०२/०६/२०२२ चे पत्र

३.उपजिल्हाधिकारी धुळे यांचे क्र.क/कक्ष-५/ग्रापंनि/कावि/९१०/२०२२, दिनांक ०१/०६/२०२२ चे पत्र

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाने दिनांक ३० मे, २०२२ च्या आदेशान्वये **माहे जानेवारी २०२१ ते एप्रिल २०२२ मध्ये मुदत संपलेल्या सुमारे १९९३ ग्रामपंचायती व माहे मे २०२२ ते डिसेंबर २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या सुमारे ७६३८ ग्रामपंचायती तसेच नव्याने स्थापित झालेल्या ग्रामपंचायती, आयोगाने प्रभाग रचना व आरक्षणाबाबत दिनांक २९/११/२०१९ रोजी दिलेला कार्यक्रम योग्यरित्या न राबविल्यामुळे संपूर्ण निवडणूक कार्यक्रम रद्द केलेल्या सुमारे १०१ अशा एकुण ९७३२ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक** निवडणुकांकरीता आरक्षण सोडतीचा कार्यक्रम देण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडून संदर्भाधीन पत्रान्वये केलेली विनंती विचारात घेता पुढीलप्रमाणे आरक्षण सोडतीचा **सुधारीत कार्यक्रम** देण्यात येत आहे.

| आरक्षणाची सोडत | कार्यवाही पूर्ण करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|
| i) विशेष ग्रामसभेची सूचना देणे ( आरक्षणाची सोडत काढण्याकरीता ) | ०३/०६/२०२२ |
| ii) विशेष ग्रामसभा बोलवून, तहसिलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली,प्रारुप प्रभाग रचनेवर आरक्षणाची सोडत काढणे ( अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, व सर्वसाधारण महिला) | ०६/०६/२०२२ ते ०७/०६/२०२२ पर्यंत |
| iii) सोडतीनंतर प्रभागनिहाय आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द करणे | ०९/०६/२०२२ |
| iv) प्रभागनिहाय आरक्षण निश्चितीबाबत हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | ०९/०६/२०२२ ते १३/०६/२०२२ |
| v) उपविभागीय अधिकारी यांनी प्राप्त हरकती विचारात घेऊन अभिप्राय देणे | १६/०६/२०२२ |
| vi) उपविभागीय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन अंतिम अधिसूचनेस (नमुना अ) जिल्हाधिकारी यांनी मान्यता देणे | २०/०६/२०२२ |
| vii) जिल्हाधिकारी यांनी मान्य केलेल्या अंतिम प्रभाग रचनेला (नमुना अ) व्यापक प्रसिध्दी देणे | २१/०६/२०२२ |

राज्य निवडणूक आयोगाने दिनांक ३० मे २०२२ रोजी दिलेल्या आदेशासोबतच्या परिशिष्ट १ नुसार प्रारुप अधिसूचना व परिशिष्ट २ नुसार अंतिम अधिसूचना प्रसिध्द करण्यात यावी.

तसेच आरक्षण सोडतीच्या उक्त कार्यक्रमास व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

( अविनाश सणस )
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रती -

१.प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन.

**उक्त कालावधीतील ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसंदर्भात अनुदानाची पर्याप्त तरतूद (मागील अनुदानाच्या थकबाकीसह) करण्याबाबत आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही सत्वर करावी. तसेच या पत्रात निर्देश दिल्यानुसार ग्रामसेवकासह संबंधित गटविकास अधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं.) जिल्हा परिषद यांची सक्रिय भूमिका व जबाबदारी राहील, याबाबतचे निर्देश देणारे पत्र आपणाकडून तातडीने निर्गमित करण्यात यावे.**

२.सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी.

३.विभागीय आयुक्त (सर्व),

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)

५.माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

६.सर्व निवडणूक कार्यासने

७.निवड नस्ती.